MHSO130002642026

नियमित दिवाणी दावा क्र.२३२/२०२६
उत्तम सातपुते वगैरे
वि.
दादासाहेब सातपुते वगैरे

## निशाणी क्र.५ वर आदेश

वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांच्याविरुध्द जाहीर होऊन मिळणेबाबत तसेच निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत करुन प्रस्तुतचा अर्ज हा तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे. वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत क्र.१अ गट नं.२१३ मधुन जड वाहने जाणेयेणेसाठी प्रथम मौजे दहिटणे-ढोराळे डांबरी रस्त्यापासुन पश्चिम पुर्व चालीने मुळ गट नं.२११ उत्तर बांधा जवळुन म्हणजेच गट नं.२१८/२ मधील जिल्हा परीषद शाळा व दळवे वस्तीच्या जवळुन पुढे गट नं.२१४/१ च्या पश्चिम भागातुन उत्तर-दक्षिण चालीने वादींना गट नं.२१२ मधील देवदेवतांची पुजाअर्चा करुन गट नं.२१३ मधील क्षेत्रापर्यंत जाणेयेणेसाठी चालु असलेला जड वाहन पुर्व परंपरागत वहिवाटीचा रस्ता आहे. दावा मिळकत क्र.१ब मौजे दहिटणे मधील गट नं.२१२ मध्ये ० हे ५ आर मध्ये वादीचे पुर्वज मयत सोमा मारुती सातपुते यांचा १/३ हिस्सा मागील ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासुन आहे. प्रतिवादी हे वादींची सदरील १/३ हिश्शाची मालकी नाकारुन त्यांचया वहिवाटीच्या रस्त्यास व देवदेवतांची पुजाअर्चा करण्यास तसेच हक्कास नकार देऊन सदरील रस्ता नष्ट करण्याची भाषा करीत आहेत. त्याबाबत वादींनी तहसीलदार व पोलीस उपअधिक्षक यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला आहे. सबब, प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी हे त्यांच्या शांततामय कब्जे वहिवाटी असलेल्या क्षेत्रास, रस्त्यास प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये याबाबत तुर्तातुर्त ताकीदीची मागणी केली आहे.

२] वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी क्र.४ खाली दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल केलेल्या दावा मिळकत क्र.१ब गट नं.२१२ च्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी यांचे पुर्वहक्कदार तसेच अंबरीष कृष्णा सातपुते व प्रतिवादी क्र.१ ते ३ तसेच पांडुरंग नवनाथ काशीद यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येत आहे.

अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुन  न घेता कोणताही तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही.  वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतींमधले असलेले हक्क, अधिकार तसेच सामाईक रस्त्यावरील अधिकार व सामाईक विहीरीमधील अधिकार तसेच पुजाअर्चा करण्याचा अधिकार या सर्व बाबी विचारात घेता, प्रतिवादी यांना नोटीस काढुन त्यांचे म्हणणे घेणे न्यायोचित होईल. सबब, प्रतिवादी यांना त्यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश का पारीत करु नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस परतीची दिनांक ०७/०५/२०२६ काढण्यात यावी. विषेश बेलीफ व तात्काळ प्रोसेस आवश्यक असल्यास मंजुर करण्यात येते.

PADMASHRI VASANT RAUT

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.04.22 17:29:03 +0530

बार्शी.
दिनांक २२/०४/२०२६

**( श्रीमती पी.व्ही. राऊत )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी.**

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 22/04/2026 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 22/04/2026 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 22/04/2026 |